
ADAT VYAPARI SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal

Volume :III Issue : III (A) Oct to Dec - 2019



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | Sanskrit : A Scientific Language | Dr.Sanjivani Shripad Nerkar | 7-9 |
| 2 | AN EMPIRICAL STUDY OF AGRICULTURAL LABOUR IN INDIA | Dr.Khande Sominath Sarandhar | 10-13 |
| 3 | Causes of Climate Change in Globalized World | Dr.Jitendra Ghodke | 14-17 |
| 4 | Assessment of the Problem of Building Basement Water : A case study of shirur town, in Pune district, Maharashtra. | Dr.Atul M Jethe | 18-22 |
| 5 | "Effect of wave dynamics on the morphology of sandy beaches at village Borya & Kondkarul (South Facing) In Guhagar Taluka, Ratnagiri District, Maharashtra." | Prof.Ankush Manaji Pawar | 23-30 |
| 6 | Globalization and its impact on Literacy rates in India. | Mr.Usar Bharat Rupchand | 31-34 |
| 7 | Darwin's Theory of Evolution | Dr.Achole P.B. | 35-41 |
| 8 | Natural vegetation and Ecosystems | Dr.More Vijaykumar V. | 42-49 |
| 9 | टोकरे कोळी आदिवासी जमातीचे गुणवैशिष्ट्ये | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 50-53 |
| 10 | स्वरुप आणि व्याप्ती | प्रा.डॉ.अशोक घोळवे | 54-59 |
| 11 | सांप्रदायिक सद्भाव, राष्ट्रीय एकात्मता आणि शिक्षण | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 50-54 |
| 12 | मराठवाडयतील कादंवरी लेखन एक अभ्यास | प्रा.डॉ.अशोक घोळवे | 55-57 |
| 13 | जागतिकीकरण व मराठी कविता | प्रा.डॉ.संगीता ग. घुगे | 58-63 |
| 14 | मराठी लोकसाहित्य आणि लोकगीते : एक अभ्यास | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 64-67 |
| 15 | डोंगरातलं देऊळ : बदलत्या ग्रामसंस्कृतीचे वास्तव दर्शन | प्रा.डॉ. संजय शिंदे | 68-70 |
| 16 | रोमॅंटिसिझमशी नाते सांगणारी बालकवींची कविता | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 71-75 |
| 17 | स्त्री अत्याचार विषयी भारतीय मानसिकता | प्रा.डॉ. अनिता द. वाळके | 76-80 |
| 18 | मी पणाचा अविष्कार मरुद्गान | प्रा. मंजुळा दुल्लभ साळवे<br>प्रा.डॉ. फुला. बागुल | 80-84 |
| 19 | "ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील विद्यार्थिनीचा मानसिक स्वास्थाचा अभ्यास" | डॉ. वाटोरे एस. एम.,<br>खाडे वंदना भिमराव, | 85-90 |
| 20 | मी पाहिलेला देव ! | डॉ.अशोक मधुकरराव मुसळे, | 91-92 |
| 21 | ग्रामिण स्त्रियांच्या समस्या :एक अभ्यास | डॉ. चंद्रशेखर पाटील | 93-96 |
| 22 | महात्मा फुले यांच्या धार्मिक विचारांचे अध्ययन | प्रा.डॉ. बी. एस. लासूरे | 97-100 |

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *




| | | | |
|---|---|---|---|
| 23 | भारतातील महिला सक्षमीकरण आणि महिला सक्षमीकरण यशोजनांची वाटचाल | डॉ. गंगाधर रामराव भुक्तर | 101-109 |
| 24 | कार्यालयीन प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप | प्रा.डॉ.माधव चोल | 110-113 |
| 25 | संभूती सृजनाचा प्रमाणिक लढा | डॉ.सर्जेराव रणखांब देगलूर | 114-120 |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

ADAT VYAPARI ... DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded



# "कार्यालयीन प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप"

**प्रा.डॉ.माधव चोले**
राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड

राज्याने हाती घेतलेले कार्य प्रत्यक्षात वास्तवात आणण्यासाठी लोकप्रशासन ही राज्यशास्त्राची एक शाखा म्हणून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वतंत्र, स्वायत्त विद्याशाखा म्हणून अभ्यासली जावू लागली. यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असतो त्या एकमेकांना पुरक असतात. राज्याची कार्ये धोरण निर्माण करणे तर प्रशासनाचे कार्य धोरण निर्माण करण्यासाठी आवश्यक ती माहिती, आकडेवारी पुरविणे. शिवाय धोरणांची कार्यक्षमपणे अमलबजावणी करणे.

पारंपारिक दृष्टीकोणानुसार विड्रोविल्सने 'स्टडी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' आणि फ्रॅक जे गुडनो यांनी 'पॉलिटिक्स ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन' या ग्रंथामध्ये प्रशासन आणि राजकारण यांच्यात फारकत करण्याचे सुचविले मात्र आधुनिक दृष्टीकोणानुसार पॉल ॲपलबीने पॉलिसी ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन मध्ये ड्वाइट वाल्डोने 'द ॲडमिनिस्ट्रेशन स्टेट' या ग्रंथात तसेच ल्युथर गुलिक, रिग्झने प्रशासन आणि राजकारण संबंध घनिष्ठ असतात यावर भर दिला.

**कार्यालय व्यवस्थापन संकल्पना :-**

राज्याने निर्माणकेलेल्या धोरणांची अमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. प्रशासन हे केंद्र, राज्य आणि स्थानिक स्तरावर विभिन्न संस्थात विभाजित झालेले असते त्यास 'संस्थीभवन' म्हणतात. संस्था मध्ये कार्यानुसार श्रेणीबध्द रचनेत कार्यालये निर्माण केलेले असतात. हे कार्यालये शासनाचे धोरणे जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य करतात त्यामुळे प्रशासनात कार्यालयांना महत्वाचे स्थान आहे.

कार्यालय म्हणजे संस्थेचा असा एक भाग की, कार्यक्षम व्यस्थापनासाठी संस्थेतील व्यवहारांच्या नोंदी केल्या जातात. त्या नोंदीचे जतन व उपलब्ध केल्या जातात तसेच अंतर्गत व बहिर्गत संपर्कविषयक सोयी उपलब्ध करुन देवून संस्थेच्या निरनिराळया खात्यांच्या कामामध्ये एकसुत्रता आणली जाते,

**डेनियरच्या मते** "कार्यालय म्हणजे कारकुणी स्वरुपाची कार्य जेथे केली जातात अशी जागा"

**जार्ज टेरीने** "जेथे माहितीचे संकलन आणि माहितीच्या उपलब्धतेशी निगडीत असलेली कार्य केली जतात" त्यास कार्यालय म्हणतात.

**राजकीय हस्तक्षेपाचे स्वरुप :-**

कार्यालयीन कर्मचाऱ्याने कार्यक्षम व निपक्षपाती प्रशासन देण्यासाठी सर्व नेत्यांना बरोबर घेवून त्यांचा विश्वास संपादन करणे जरुरीचे आहे. तसेच नेत्यांनी सुध्दा आपल्या कार्यपध्दतीत बदल करुन शिस्तीने व नियमाप्रमाणे वर्तन करणे आवश्यक आहे. लोकशाही विकासासाठी नेते आणि प्रशासनाची सामंजस्याची भूमिका असली पाहिजे. पण ही राजकीय हस्तक्षेपाची परंपरा पुर्वपार चालत आलेली आहे. आणि तिचे स्वरुप सर्वकालीन सर्वव्यापक आहे. त्याचे प्रमाण सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात आहे.

Power of Knowledge Peer Review Journal,Volume : III, Issue :III (A)Oct.to Dec.2019 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

ADAT VYA... SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

• **राजकिय हस्तक्षेप वाढण्याची कारणे :-**

१. लोकशाही प्रशासनाची मुल्ये जनमानसात रुजलेली नाहीत.
२. जागरुक जनतेचा अभाव
३. जनतेचे निरक्षरता आणि अज्ञान
४. राजकीय नेते हे बहुतांशी बुध्दीजीवी नसतात
५. राजकारणात कुलीन अभिजन वर्गाचे प्रभुत्व
६. ब्रिटीश वसाहत काळातील प्रशासन आणि राजकारण संबंध
७. मतांचे राजकारण करण्यासाठी अवैध मार्गांचा वापर
८. स्थानिक हित जोपासण्यासाठी
९. पक्षीय प्रभूत्व वाढविण्यासाठी
१०. प्रशाससनाच्या विभिन्न योजना पक्षीय कार्यकर्त्यांना देण्यासाठी
११. आर्थिक हित साधण्यासाठी

इत्यादी कारणासाठी राजकीय नेते प्रशासनात वारंवार हस्तक्षेप करित असतात

**अमेरिकेत लुट पध्दती :-** ही पध्दती तर प्रशासनातील राजकीय हस्तक्षेपाचे कारण बनली होती. ही पध्दत अमेरिकेत ॲन्ड्रयु जॅक्सने १८२६ मध्ये सुरु केली होती. लुट पध्दतीचे अमेरिकन प्रशासनावर गंभीर परिणाम झालेले होते.

सत्तारुढ राजकीय नेते कार्यालयीन कर्मचाऱ्यांना स्वतःच्या हितासाठी, सत्तेसाठी आदेश देवून कामकरुन घेतात. त्या बदल्यात अधिकाऱ्यांना बढती व इतर आश्वासिलेली बक्षिसे अंतर्भूत असतात. अधिकाऱ्याने अवैद्यकृत्य करण्यास विरोध केल्यास त्याची बदली केली जाते. त्यामुळे प्रशासनाला कार्यक्षमपणे कार्य करणे अशक्य झाले आहे.

• **हस्तक्षेपांची पुर्वापार परंपरा :-**

भारतात ब्रिटीश वसाहत काळात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आर्थिक फायदयासाठी प्रशासनाचा वापर केलेला होता. स्वातंत्र्या नंतर सुध्दा ही राजकीय हस्तक्षेपाची परंपरा चालुच राहिली आहे. स्वातंत्र्यानंतर दिर्घकाळ सत्ता कॉग्रेस पक्षाची असल्याने एकाधिकारशाही निर्माण होऊन मंत्र्यांनी सत्तेचा स्वहितासाठी वापर करण्यासाठी वारंवार प्रशासनात हस्तक्षेप केलेला आहे. १९६७ च्या राज्य विधानसभा निवडणुकीत ८ राज्यात गेरकॉग्रेसची सरकारे आली त्याचा परिणाम म्हणून कॉग्रेसच्या एकाधिकारशाहीला हादरा बसला. याच काळात कल्याणकारी राज्याची भूमिका, समाजवादी व्यवस्थेचे ध्येय, विकास प्रशासनाची वाढती कामे करण्यासाठी बांधीलकीनिष्ठ नौकरशाहीचा विचार पुढे आला. त्यातुनच १९७० ते ८० च्या दशकात नोकरशाहीचे राजकियकरणे झालेले दिसते.

• **नौकरशाहीचे राजकियकरण :-**

नौकरशाहीच्या राजकियकरणामुळे प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप वाढून प्रशासनाचे दुर्बलावस्था वाढीस लागली. राजकारण्यांनी आपल्या स्वार्थी राजकारणासाठी सनदी नोकरांना वापरायचे आणि सनदी

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



सेवकांनी स्वत:साठी बढती, मेहरबाणी, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी राजकारण्यांची कास धरायची. यास नोकरशाहीचे राजकियकरण म्हणतात. कॉंग्रेस शासनाच्या काळात जेष्ठ सनदी अधिकाऱ्यांना राज्यपाल, राजदुत, महामंडळाचे अध्यक्ष नियुक्त केलेले होते.

नोकरशाहीच्या राजकियकरणाने प्रशासनातील दोष ---

१. राजकारणात व प्रशासनात भ्रष्टाची प्रवृत्ती वाढून जनहिताकडे दर्लक्ष झाले.

२. सत्ताधाऱ्यांना विरोध करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवृत्तीपुर्वीच पदच्युत व्हावे लागते.

३. नोकरशाहीची गुणवत्ता व कार्यक्षमता यापेक्षा राजकारण्यांची निष्ठा महत्वाची बनली.

४. प्रशासनात अकार्यक्षमता वाढीस लागली.

राजकीय हस्तक्षेपाने प्रशासनातील अनेक भ्रष्टाचारी प्रकरणे उघडकीस आले. संसदनिधी घोटाळा, बोफोर्स घोटाळा, पानबुडी घोटाळा, चारा घोटाळा इ.

**• निवडणुक प्रशासनातील हस्तक्षेप**

निर्वाचन आयोगाच्या कार्यालयीन प्रशासनातही राजकीय हस्तक्षेपाचे प्रमाण सतत वाढते आहे. मुख्य निवडणुक आयुक्तांच्या नियुक्तीमध्ये सत्ताधारी पक्ष आपल्या पक्षास अनुकुल व्यक्तिची निवड मुख्य आयुक्तपदी करण्याचा प्रयत्न करतात. शिवाय निवडणुक अधिकाऱ्यावर दबाव आणुन आपल्या पक्षास अनुकुल कृति करुन घेतात. उदा. उमेदवार यादीत फेरबदल करणे.

**• स्थानिक प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप**

स्थानिक प्रशासनात तर राजकीय हस्तक्षेपाचे प्रमाण तीव्र वाढले आले आपल्या राजकीय पक्षास अनुकुल प्रशासकीय अधिकारी आणयासाठी प्रयत्नशील असतात. अडथळे आणणारे विस्तार अधिकारी, कारकुन, पंचायत समित्याचे सचिव यांच्या बदल्या केल्या जातात. अनुकुल प्रशासकीय अधिकाऱ्यांमार्फत मतांचे राजकारण करण्यासाठी मरजीच्या शिक्षकांची निवड करणे, शासकीय योजनांचे वितरण, दारिद्र रेषेखालील नावे, घरकुल योजना, विहिरी वाटप, नातेवाईकांना, पक्षीय सहकार्यांना वाटप करतात. काही प्रसंगी सतर्क विरोधीपक्ष याबाबी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर ठेवतात.

जि.प.अध्यक्ष हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर दबाव आणुन अवैध कामे करुन घेण्याचा प्रयत्न करतात. असे असले तरी अलीकडच्या काळात सत्ताधारी राजकारण्यांना त्यांच्या गैरवर्तनाबददल आळा घालण्याचे धैर्य अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दाखविले आहे. त्या अरुन भाटीया, गो.रा.खैरनार दिल्ली विकास प्राधिकरणात असलेले आयुक्त श्री. आल्फोन्स यांनी १४०० बेकायदेशीर बांधकामे जमीनदोस्ते केली, ठाण्याचे आयुक्त चंद्रशेखर यांनी बेकायदेशीर बांधकामाविरुध्द कार्यवाई केली. तसेच किरण बेदीचे कार्य इ.

पॉल ॲपलबीने स्पष्ट शब्दात आजच्या प्रशासनाला राजकीय स्वरुप प्राप्त झालेले आहे. कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या दर्जाबददल अरुन शौरी म्हणतात **कार्यालयीन कर्मचारी राजदरबारी खुशामती करतात** तर लेसली लिपसनच्या मते **वाढत्या राजकीय हस्तक्षेपामुळे नेते आणि प्रशासनात टकराव निर्माण झाला आहे.**

• सुधारणात्मक तरतुदी :-

राजकीय हस्तक्षेप कमी होऊन सुशासन निर्माण होण्यासाठी काही सुधारणात्मक तरतुदी

१. कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी निपक्षपातीपणे कार्य करणे अनिवार्य

२. राजकीय दृष्टया पुर्णतहा तटस्थता पण सुशासनासाठी सहकार्य मात्र असावे

३. सनदी सेवकांना आपले आदर्श आणि आपले सिध्दांत यांना बांधील असावे तरच जनहिताचे उद्देश सफल होतात.

४. जनतेच्या कार्याला कर्मचाऱ्यांनी प्रतिबध्दित करुन घ्यावे.

५. राजकीय पक्षाचे आश्रित होता कामा नये. राजकीय पक्षाशी बांधीलकी ठेवल्यास ती राजकीय पक्षाची गुलामगिरी स्विकारल्यासारखी आहे.

६. निर्भयपणे कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संरक्षण देणे अनिवार्य

७. मनोधैर्य उंचावण्यासाठी योग्य वेतन, सुरक्षा, प्रतिष्ठा देणे अगत्याचे

८. लोकपाल व लोकायुक्त पदांची निर्मिती करणे आवश्यक आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी व मंत्र्यांना वचक बसेल.

९. मंत्री व अधिकाऱ्यांसाठी एक निश्चित अचारसंहिता असावी.

१०. केंद्रीय सतकर्ता आयोगाच्या कार्याय गती देणे तसेच केंद्रीय अन्वेषण ब्युरोच्या कार्यासुध्दा गती येणे आवश्यक आहे.

कार्यासुध्दा गतीयेणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :-**


१. राज्यशास्त्र कोष - डॉ. राजेंद्र व्होरा आणि सुहास पळशीकर

२. लोकप्रशासन सिध्दांत आणि व्यवहार - डॉ. अवस्थी व माहेश्वरी

३. लोकप्रशासन सिध्दांत आणि व्यवहार - डॉ.बी. एल. फडीया

४. पंचायतराज आणि नागरी प्रशासन - डॉ.अर्जुनराव दर्शनकार (पेज ८४ ते ८८)

५. भारतीय लोकप्रशासन एंव भ्रष्टाचार- डॉ.भगवानदास प्रतियोगिता दर्पन/जुलाई/२००६/पेज २२००

६. भारत मे प्रशासनिक सुधार एक अध्ययन - डॉ.उमेशचंद्र अग्रवाल प्रतियोगिता दर्पन /डिसेंबर/ २००६/पेज ८३८

७. कार्यालयीन व्यवस्थापन - डॉ. महेश कुलकर्णी, डॉ.प्रमोज बियाणी(पेज - ०२)



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded